# सज्जाद हुसेन - भाग १



काही लोकांना दुसऱ्यांना विनाकारण खिजवायची, नावे ठेवण्याची वाईट सवय असते आणि त्यांना त्याची किंमतही चुकती करावी लागते ह्याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे सज्जाद हुसेन होय. सज्जाद साहेबांच्या मते तलत मेहमूद म्हणजे 'गलत' मेहमूद ! हे काहीच नाही. त्यांच्या पुढ्यात नौशादचे नाव उच्चारणे देखील चुकीचे होते. सज्जाद यांच्या मते, संपूर्ण संगीत क्षेत्रात ज्यांचा उदो उदो केला जातो, ते त्या योग्यतेचे नाहीच आहेत. फक्त लता आणि नूरजहाँ हे दोनच सच्चे कलावंत आहेत आणि त्यातही त्या दोघींनी गायलेल्या गाण्यांतही 'रुस्तुम सोहराब'मधील लताचे 'ऐ दिलरुबा नजरे मिला' हे गाणे तर नूरजहाँचे 'दोस्त'मधील 'बदनाम मुहब्बत कौन करे' हे गाणे सर्वश्रेष्ठ आहेत. तुमच्या लक्षात आलेच असेल की ह्या दोन्ही गाण्यांचे संगीतकार कोण आहेत!!

बारीक सारीक गोष्टींतही ते सहज दुखावले जात. त्यांच्या हुसेन या नावाचे स्पेलिंग दोन एस् वापरून कोणी केले किंवा उर्दूत लिहीताना 'सीन'वर जोर दिला तर त्यांना राग येत असे. दुसऱ्यांची टीका करण्यापेक्षा सज्जाद यांनी आपली संपूर्ण ताकद आणि कौशल्य संगीतरचना करण्यात घालवलं असतं तर त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये संगीत दिलेल्या १४ चित्रपटांपेक्षा नक्कीच जास्त चित्रपटांना संगीत दिले असते. एवढेच नव्हे तर संगीतक्षेत्रात त्यांचे नाव नक्कीच उंचावले असते.

१९१७ मध्ये मध्य प्रदेशातील सितामऊ येथे, संगीताचे वातावरण असलेल्या घरात, सज्जाद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील मोहम्मद अमिर खान हे सतार वाद्याचे ख्यातनाम जाणकार होते. सज्जाद आणि त्यांच्या चारही बंधूंना त्यांनी सतारीचे शिक्षण देण्याचे प्रयत्न केले परंतु पाण्यातील मासोळीने जेवढ्या शिताफीने पाण्यात वावरावे त्या सफाईने एकट्या सज्जाद ह्यांनीच सतारीचे शिक्षण घेतले. इतर बंधूंनी तो नाद सोडून दिला. दोन वर्षांनंतर सज्जाद यांनी इतरही वाद्यांचा अभ्यास केला आणि तीही त्यांनी आत्मसात केली. ती वाद्ये म्हणजे बासरी, पियानो, जलतरंग, बँजो, व्हायोलिन, क्लॅरिनेट, अकॉर्डिअन, मेंडोलिन, हार्प, वीणा आणि स्पॅनिश व हवाईअन गिटार होय. लोक त्यांना केवळ संगीतकार म्हणून जाणत नसत तर ते म्हणजे एक संपूर्ण ऑर्केस्ट्राच होता. परंतु सर्व वाद्यांत मेंडोलिन त्यांना जवळचे वाटे आणि गंमत म्हणजे पुढे त्यांना ५ मुलगे झाले आणि ते सर्वचजण मेंडोलिन वाजवण्यात पारंगत होते. एवढेच नव्हे तर त्यांनी सर्व प्रकारची वाद्ये वाजवण्याचा धंदा किंवा व्यवसाय केला. हौस किंवा छंद न होता तो त्यांचा पेशाच झाला.

चित्रपटसृष्टीत काम मिळेल का हे बघण्यासाठी १९४०च्या दरम्यान सज्जाद मुंबईत आले. तेव्हा येथे अनिल विश्वास, खेमचंद प्रकाश, सरस्वतीदेवी आणि झंडेखान तर कलकत्त्यात आर. सी. बोराल आणि पंकज मलिक यांसारखे सृजनशील कलावंत मौजूद होते. पंडित हनुमान प्रसाद या संगीतकारांनी सज्जाद यांचे गुण हेरून त्यांची निवड केली तर त्यांनीच पुढे गीता रॉय (दत्त) हिलाही शोधून काम दिले. पंडित हनुमान प्रसाद आणि सज्जाद या दोघांनी मिळून १९४४ मध्ये 'गली' या चित्रपटाला संगीत दिले. मात्र लवकरच सज्जाद यांनी स्वतंत्रपणे 'दोस्त' या चित्रपटाला संगीत दिले. या चित्रपटात वर उल्लेखिलेल्या 'बदनाम मोहब्बत कौन करे' आणि 'कोई प्रेम का देके संदेसा' या दोन गाण्यांसह आणखी बरीच गाणी नूरजहाँ यांनी म्हटली आहेत. परंतु ह्यामधील संगीतरचनेला उदंड यश मिळूनही यानंतरच्या चित्रपटांत मात्र ते रसिकप्रिय गाणी देऊ शकले नाहीत. परंतु त्यातही एखादे हटके असे सुंदर गाणे होतेच ! जसे की १९५० च्या 'दिल' मधील लताचे 'भूल जा ऐ दिल किसीसे दिल लगाना, वो सपना था सुहाना' हे लयबध्द झोकदार गाणे रसिकांना भावणारेच होते.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or

young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com